महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १७४ वे | दिनांक : १९/०६/२०२६ | वार : शुक्रवार

## 'अर्धा तास ईडी-सीबीआय द्या, आधी त्या मंत्र्यालाच फोडतो'; राऊतांच्या आव्हानाला महाजनांचे प्रत्युत्तर



मुंबई : 'माझ्याकडे अर्ध्यातासासाठी ईडी-सीबीआय द्या. सगळ्या आधी गिरीश महाजनांना फोडतो,' असा हल्लाबोल संजय राऊत यांनी केला. 'महाजनांना नाही फोडले, तर मग विचारा. नाशिकच्या कुंभमेळ्यात हिंदुत्वाच्या नावाने भ्रष्टाचार चाललाय. मी सगळं काढणार आहे,' असा इशाराही राऊत यांनी दिला. महाराष्ट्रातील राजकीय भूकंप आणि पक्षांतराच्या नाट्यावर आता उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. "आमचे खासदार फुटल्याची आवई उठवणाऱ्यांनी आधी स्वतःची लायकी तपासावी," अशा तिखट शब्दांत राऊत यांनी महायुती सरकारवर हल्लाबोल केला.

"संजय राऊत यांचा राजकीय आणि मानसिक तोल पूर्णपणे ढासळला आहे. ते कोणत्याही विषयावर, कोणाबद्दलही अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन बोलत आहेत. राऊतांची भाषा राजकारणाला न शोभणारी आहे,' असे प्रत्युत्तर मंत्री गिरीस महाजन यांनी दिले.

सध्या राजकीय वर्तुळात चर्चेत असलेल्या 'ऑपरेशन टायगर'चा समाचार घेताना संजय राऊत म्हणाले, "ज्याला सत्ताधारी 'ऑपरेशन टायगर' म्हणत आहेत, ते प्रत्यक्षात ईडी, सीबीआय आणि पैशांच्या बळावर केलेले घाणेरडे राजकारण आहे. वाघाची कातडी पांघरल्याने कोणी वाघ होत नाही. निष्ठा विकून सत्तेच्या मागे जाणाऱ्यांना जनता कधीही माफ करणार नाही. हा वाघांचा खेळ नसून लाचखोरांचा बाजार आहे."

राऊत यांनी महायुतीला थेट आव्हान दिले. "जर तुमच्यात एवढीच हिंमत असेल आणि तुमचे 'ऑपरेशन' इतकेच यशस्वी झाले असेल, तर फोडलेल्या लोकप्रतिनिधींचे राजीनामे घ्या आणि त्यांना पुन्हा जनतेच्या दारात उभे करा. निवडणुकीला सामोरे जाण्याची हिंमत महायुतीमध्ये आहे का? जनताच ठरवेल की खरा वाघ कोण आणि पाळीव कोण!" असा थेट सवाल राऊत यांनी उपस्थित केला.

संजय राऊत यांनी पक्ष सोडून जाणाऱ्यांवरही कडक शब्दांत तोफ डागली. "शिवसेना हा केवळ एक पक्ष नाही तर तो एक विचार आहे. बाळासाहेबांच्या विचारांशी आणि उद्धव ठाकरेंच्या निष्ठेशी ज्यांनी प्रतारणा केली, त्यांना महाराष्ट्राचा राजकीय इतिहास कधीही थारा देणार नाही. सत्तेचा अमरपट्टा घेऊन कोणीही आलेले नाही, आज जे सत्तेच्या मांडीवर बसलेत, त्यांना उद्या रस्त्यावर आल्याशिवाय पर्याय उरणार नाही," असा इशाराही त्यांनी दिला.

महाराष्ट्रातील राजकीय कलगीतुरा अधिकच धारदार होताना दिसत आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्याकडून होणाऱ्या सातत्याच्या टीकेला आता महायुतीकडून जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले आहे. राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी नाशिकमध्ये बोलताना संजय राऊत यांच्या वक्तव्यांचा खरपूस समाचार घेतला असून, त्यांच्या भाषेवर तीव्र आक्षेप नोंदवला आहे. 'मानसिक तोल बिघडलाय'नाशिकमधील एका कार्यक्रमानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना गिरीश महाजन यांनी संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला.

महाजन म्हणाले की, "संजय राऊत यांचा राजकीय आणि मानसिक तोल पूर्णपणे ढासळला आहे. ते कोणत्याही विषयावर, कोणाबद्दलही अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन बोलत आहेत. कालपरवापर्यंत तर त्यांनी थेट आई-बहिणींवरून शिवीगाळ करण्यापर्यंत मजल मारली होती. लोकशाहीत आणि महाराष्ट्राच्या राजकारणात अशा प्रकारची शिवराळ भाषा कधीही स्वीकारली जाऊ शकत नाही," अशा शब्दांत महाजन यांनी आपला संताप व्यक्त केला.

'तुमच्या बडबडीमुळेच पक्षाचा ऱ्हास'संजय राऊत यांच्यावर खोचक शब्दांत टीका करताना महाजन पुढे म्हणाले की, "राऊत यांच्याकडे सकाळी उठून नको ती बडबड करण्याशिवाय आता दुसरा कोणताही उद्योग उरलेला नाही. त्यांच्या याच अशा वर्तनामुळे आणि विधानांमुळे शिवसेनेची आज ही अवस्था झाली आहे. पक्षाचा झालेला ऱ्हास हा त्यांच्यामुळेच आहे. हे असेच सुरू राहिले, तर आगामी काळात त्यांच्यासोबत साधे नगरसेवकही शिल्लक राहणार नाहीत," असा टोलाही त्यांनी लगावला.

'17 पैकी एखादी जागा तरी जिंकून दाखवा!' गिरीश महाजन यांनी आगामी राजकीय लढाईचे आव्हान देत राऊतांना सुनावले की, "केवळ कॅमेऱ्यासमोर बसून मागण्या किंवा आरोप करण्यापेक्षा जमिनीवर काम करा. किमान 17 जागांपैकी एखादी तरी जागा निवडणुकीत जिंकून आणण्यासाठी मेहनत घ्या, उगीच नुसती वक्तव्ये करून वेळ वाया घालवू नका." महाजन यांच्या या थेट विधानामुळे आता ठाकरे गट आणि भाजपमधील राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

## विधान परिषद निवडणुकीवर मविआचा आरोप; 'पैशांच्या जोरावर जागा बिनविरोध'



छत्रपती संभाजीनगर : राज्य विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील १७ पैकी ६ जागांवर महायुतीने मतदानापूर्वीच बिनविरोध विजयाचा गुलाल उधळला आहे. आता उर्वरित ११ जागांसाठी आज मतदान पार पडत आहे. यात संपूर्ण राज्याचे लक्ष छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघाकडे लागले असून येथे भाजपचे सुहास शिरसाठ व ठाकरे गटाचे गणेश लोखंडे यांच्यात थेट व अटीतटीची लढत होत आहे.

दिवंगत नेते अजित पवार यांच्या पश्चात सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाचा कसही लागेल. महायुतीचे हे ६ उमेदवार आधीच बिनविरोध विजयी झाले आहेत. सत्ताधारी महायुतीने 'मास्टरस्ट्रोक' लगावत ६ जागा बिनविरोध जिंकून 'बूस्टर डोस' मिळवला आहे.

महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी चुरशीची लढाई रंगणार असून, २२ जून रोजी होणाऱ्या मतमोजणीत नेमका कोणाचा पत्ता कट होणार आणि कोणाला गुलाल लागणार, याचे चित्र स्पष्ट होईल.

१.वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर : अरुण लखाणी, भाजप
२.पुणे: विक्रम काकडे , राष्ट्रवादी काँग्रेस
३.ठाणे :रवींद्र फाटक , शिवसेना
४.रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग : अनिकेत तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस
५.यवतमाळ : दुष्यंत चतुर्वेदी, शिवसेना
६.अहिल्यानगर: प्राजक्त तनपुरे, भाजप
७.सोलापूर राजेंद्र राऊत (भाजप) वि. वसंतराव देशमुख (राष्ट्रवादी शप)
८.जळगाव - नंदकिशोर महाजन (भाजप) वि. शरद तायडे (शिवसेना उबाठा)
९.सांगली-सातारा - धैर्यशील कदम (भाजप) वि. अभयसिंह जगताप (राष्ट्रवादी शप) वि. किशोर धुमाळ (अपक्ष)
१०.नांदेड - अमर राजूरकर (भाजप) विरुद्ध कृष्णा पाटील (शिवसेना उबाठा)
११.नागपूर (पोटनिवडणूक) डॉ. राजीव पोतदार (भाजप) विरुद्ध अतुल लोंढे)
१२.भंडारा-गोंदिया - अविनाश ब्राह्मणकर (भाजप) विरुद्ध नरेश ईश्वरकर
१३.नाशिक - नरेंद्र दराडे (शिवसेना) विरुद्ध गोकुळ गीते (अपक्ष)
१४.अमरावती - प्रवीण पोटे (भाजप) विरुद्ध हर्षदीप देशमुख (काँग्रेस)
१५.धाराशीव-लातूर-बीड - बसवराज पाटील (भाजप) विरुद्ध महेश देशमुख (काँग्रेस)
१६.परभणी-हिंगोली - सईद खान (शिवसेना) विरुद्ध डॉ. विवेक नावंदर
१७.छत्रपती संभाजीनगर - जालना सुहास शिरसाट (भाजप) विरुद्ध गणेश लोखंडे (ठाकरेंची शिवसेना)

सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ विधान परिषद निवडणुकीसाठी आज अत्यंत चुरशीने आणि उत्साहात मतदान पार पडले. या निवडणुकीत तब्बल 99.89% मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावत एक नवा विक्रम नोंदवला आहे. मतदारसंघात एकूण 895 मतदार असून, त्यापैकी 894 सदस्यांनी मतदान केले. केवळ एका मतदाराचा अपवाद वगळता सर्व लोकप्रतिनिधींनी मतदानात सहभाग घेतला. सकाळी 8 ते दुपारी 4 या वेळेत एकूण 12 मतदान केंद्रांवर संपूर्ण शांततेत आणि सुरळीतपणे ही प्रक्रिया पार पडली.

या निवडणुकीत महायुतीचे भाजपचे उमेदवार धैर्यशील कदम आणि महाविकास आघाडीचे उमेदवार अभयसिंह जगताप यांच्यात थेट आणि प्रतिष्ठेची लढत होत असल्याने, या विक्रमी मतदानामुळे दोन्ही गटांतील धाकधूक आणि उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १९ जून २०२६



१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103 8830838903

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics


रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास


9405109103 | 8830838903


## ठाकरे गटातून भाजपमध्ये जाणाऱ्यांवर ओवैसींचा निशाणा; 'शिकारी नवा, जाळं जुनंच!'



**मुंबई** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील खासदारांच्या कथित फुटीच्या चर्चांदरम्यान एआयएमआयएमचे अध्यक्ष आणि खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी सोशल मीडियावरून मोठे वक्तव्य केले आहे. ठाकरे गटातील काही खासदार भाजपकडे जाण्याच्या चर्चांवर भाष्य करताना ओवैसी यांनी विरोधकांनाच अनेक सवाल उपस्थित केले आहेत. ओवैसी यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, ठाकरे गटातील काही खासदार भाजपमध्ये जाण्याचा विचार करत असतील, तर संबंधित खासदारांना नेमकी धमकी कोणी दिली, हे दोन प्रमुख खासदारांनीच स्पष्ट करावे. त्यांनी उपरोधिक शब्दांत म्हटले की, "कदाचित आपल्याला त्या दोन प्रमुख खासदारांनाच विचारावे लागेल की, या खासदारांना भाजपमध्ये जाण्यासाठी नेमकी कोणी धमकी दिली?“ ओवैसी यांनी यावेळी इतर पक्षांतील फुटींचाही उल्लेख केला. त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, "मग तृणमूल काँग्रेसचे इतर १९ खासदार का पक्ष सोडून गेले होते?“ यातून केवळ एका व्यक्तीला किंवा एका नेत्याला दोष देऊन पक्षातील सर्व समस्या झाकता येणार नाहीत, असा अप्रत्यक्ष टोला त्यांनी लगावला. ओवैसी यांनी म्हटले की, “तुमच्या सर्व अपयशासाठी एका 'प्रमुख खासदाराला' जबाबदार धरता येणार नाही.” राजकीय पक्षांमधून मोठ्या प्रमाणात होणाऱ्या पक्षांतरामागील मूळ कारणांचा विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी सूचित केले. आपल्या पोस्टमध्ये ओवैसी यांनी आणखी एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला. “भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात प्रवेश करणे इतके सोपे का आहे? हे सर्व लोक पक्ष सोडून का पळत आहेत?” त्यांच्या या प्रश्नामुळे पक्षांतराच्या राजकारणावर नव्याने चर्चा सुरू होण्याची शक्यता आहे. ओवैसी यांनी आपल्या पोस्टमध्ये कुराणमधील एका आयतीचाही उल्लेख केला. त्यांनी लिहिले, “प्रत्येक निंदा करणाऱ्याचा आणि बदनामी करणाऱ्याचा नाश होवो.” यातून त्यांनी नाव न घेता काही नेत्यांवर टीका केल्याचे मानले जात आहे.पोस्टच्या शेवटी ओवैसी यांनी एक राजकीय उपरोधात्मक वाक्य वापरले.

## नेता प्रविणकुमार अहिरे यांना साई प्रेरणा गौरव पुरस्कार जाहीर



**कन्नड (प्रतिनिधी)** : कन्नड तालूक्यातील धामणी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक उत्तम निवेदक आणि छंदाने कवी,गायक,लेखक,निर्माता,दिग्दर्शक व अभिनेता अशा अष्टपैलु कलावंत असलेल्या प्रविणकुमार अहिरे यांना 'ओम साई विकास प्रतिष्ठान' आणि 'बी.बी.सी.फिल्म प्रॉडक्शन' महाराष्ट्र राज्य निर्मित २०२६ चा 'साई प्रेरणा गौरव पुरस्कार' नुकताच निवडपत्र देऊन, जाहीर करण्यात आला असून सिनेअभिनेता प्रविणकुमार अहिरेंनी कला व चित्रपट क्षेत्रात घेतलेली गरुडझेप, केलेले कार्य व दिलेल्या योगदानामुळेच पुरस्कारासाठी त्यांची निवड झाल्याचे संयोजकांनी सांगितले. अहिरेंना हा पुरस्कार महाराष्ट्रासह गोवा राज्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर समाजसेवक,साहित्यिक,पत्रकार,कलावंत आणि उद्योजक यांच्या प्रमुख उपस्थितीत तथां मराठी चित्रपटसृष्टीतील जेष्ठ व सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री अलकाताई कुबल (आठल्ये) यांच्या शुभहस्ते साईनगरी शिर्डीत प्रदान केला जाणार आहे.अतिशय दुर्गम भागातील खेडेगावात नोकरी करणारा एक सामान्य शिक्षक पण परीवारातुनच वडीलोपार्जित अंगभूत कलेचा वारसा लाभलेल्या अहिरे यांनी शालेय जीवनापासुन ते आतापर्यंत अनेक नाटके,गाणी,आर्केष्ट्रा, वेबसिरीज,लघूपट,चित्रपटांचे लेखन,गायन,दिग्दर्शन,निर्मिती व अभिनय केलेला असून "संघर्ष" अर्थात 'वणवा भडकला क्रांतीचा','कुंकू पुसलं राजकारणानं','पाप बोलले सत्यासाठी','सांभाळ तुझे सौभाग्य','दैव जाणिले कुणी','लेखणी माखली रक्तानं','आमदार सौभाग्यवती','अर्धसत्य' ही नाटके तर 'चौफुली' (झलक प्रॉडक्शन),'नाद खुळा', 'लग्नाचा करार नवरदेव फरार', 'तात्याची पोर जिवाला घोर', 'कथा कर्माची','दारुडा नवरा बायको बेजार' ह्या वेबसिरीज तसेच "घरजावाई","परसु अक्का" "रंग वेगळा प्रेमाचा",हिंदी व मराठी दोन्ही भाषेतुन थिएटर रिलीज व कान्स महोत्सवापर्यंत पोहचलेला "कर्मयोगी आबासाहेब","Bad addiction",शिवकन्या (न्याय काल आणि आज),"पेईंग गेस्ट बॉईज","टम-टम","सावकार" तसेच स्वत:च्या 'नानाई फिल्मस् प्रॉडक्शन' ची निर्मिती असलेला "धागा" 'हे बंध प्रीतीचे,इ.चित्रपट केलेत.आणि यु-ट्युबसाठी 'नादान दिल मन्हा राणी','माझ्या भिमानं लिहलं भारताचं संवीधान', 'थंडी पडयं राणी' ही गाणीही बनवली आहेत.त्यांचे आगामी 'क्रांतीवीर बिरसा मुंडा' ( टी.व्ही.मालिका) लघूपट "कोयताबंद"आणि "हुंदका -द व्हायरस" हे प्रोजेक्ट प्रदर्शनाच्या मार्गावर आहेत. सिनेअभिनेता प्रविणकुमार अहिरे यांना जाहीर झालेल्या या पुरस्काराबद्दल महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १९ जून २०२६


## बगळ्याचा रंग

फार वर्षांपूर्वी म्हणे
पांढरे होते सर्व पक्षी
पंखावर नव्हती त्यांच्या
रंगबिरंगी नक्षी

पाऊस आला की मोर
पांढरा पिसारा फुलवायचा
कावळ्यालाही पांढरा रंग
खूप खूप आवडायचा

एकदा सर्व पक्षी
मारीत होते गप्पा
तेवढ्यात आकाश मार्गाने
जात होते देवबाप्पा

देवबाप्पा कंटाळून गेले
पाहून पक्ष्यांचे पांढरे रंग
त्यांनी मनाशीच ठरवले
पक्ष्यांना द्यायचे विविध रंग

देवबाप्पांनी सर्व पक्ष्यांना
दरबारी बोलवीले
एका रांगेत सर्व पक्षी
शिस्तीने उभे राहिले

रंगांचे हांडे आणण्यात
देवबाप्पा झाले दंग
प्रत्येकाला देऊ लागले
आवडीप्रमाणे रंग

कावळा देवबाप्पाला म्हणाला
पांढरा रंग मळतो फार
मला रंग हवाय
कोळशासारखा काळाशार

पोपटी रंग मिळाल्याने
पोपटास आनंद झाला भारी
देवबाप्पाचे आभार मानत
मारली उंच भरारी

मोराच्या पिसाऱ्यावर
देवबाप्पाने
केली विविध रंगांची उधळण
सर्व पक्षी चकीत झाले
मोराचे सुंदर रूप पाहून

बगळ्याचा येता नंबर
संपले हंड्यातील सर्व रंग
तेव्हापासून बगळ्याचा
पांढराच राहीला रंग




- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## वसुंधरेची ओटी भरा!

झाडे लावा, झाडे जगवा,
रानावनात सर्वांनी आता.
नाहीतर त्रास होईल भाऊ,
रोगराईने जीव जाता जाता. १

झाड देते शुद्ध हवा-पाणी,
उन्हाळ्यात देते सावली तुला.
एका झाडाचे महत्व सर्वांनी,
समजून द्यावे आपल्या मुला. २

पावसाळ्यात ढगांना रोखून,
पाऊस पाडतो पुन्हा पुन्हा,
वृक्षतोड करून कशाला करता,
वृक्षतोड करण्याचा पुन्हा गुन्हा. ३

पाऊस पाणी खूप पडणार,
वृक्षाचे संवर्धन सर्वांनी करा.
झाडे लावून, झाडे जगवून,
तुम्ही वसुंधरेची ओटी भरा! ४

वड, पिंपळ, हिरवे झाड,
ऑक्सीजन देते खूप खूप.
ढग अडवता पाऊस पडेल,
शेत शिवाराचे बदलेल रूप. ५




- नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर



प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क
9405109103


# कृतज्ञता सोहळयात शिंदे परिवाराकडून विद्यार्थ्यांना भेटवस्तूचे वाटप



**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** डॉ. शिवाजी शिंदे यांच्या सेवानिवृत्ती सोहळा नुकताच पार पडला. या पार्श्वभूमीवर शिंदे परिवाराकडून मंगळवारी (ता. १६) रोजी वीरशैव संत कक्कय्या सभागृहात कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मनोहर शिंदे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, सेवानिवृत्त विभागीय व्यवस्थापक डॉ. शिवाजीराव शिंदे, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राम कांबळे, सेवानिवृत्त प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, व्ही. व्ही. ए. फाउंडेशनच्या संचालिका रूपालीताई शिंदे, विकास कटकदौंड, वसंत शिंदे, महावीर नारायणकर, धनराज शिंदे, परमेश्वर काजळे आदींची उपस्थिती होती. यावेळी डॉ. महेश मोटे, डॉ. सुधीर पंचगल्ले, राम कांबळे, विकास कटकदौंड, वसंत शिंदे, तृप्ती कटके आदींनी मनोगत व्यक्त केले. सचिन शिंदे, ज्योतिराम शिंदे, धनराज शिंदे, रेवण कटके, राजेंद्र कटके, अमोल कटके, वैभव कटके, गोविंद कटके, सुरज शिंदे, मनोज शिंदे, रोहन शिंदे, ऐश्वर्या शिंदे, भक्ती कटके, तृप्ती कटके आदींचा मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन ज्योतीराम शिंदे तर आभार तात्याराव शिंदे यांनी मानले. यावेळी बहुसंख्येने समाज बांधव उपस्थित होते. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील वीरशैव संत कक्कय्या सभागृहात कृतज्ञता सोहळ्यात विद्यार्थ्यांना मनोहर शिंदे, महेश मोटे यांच्या हस्ते भेटवस्तू देताना शिवाजी शिंदे, राम कांबळे, सुधीर पंचगल्ले, विकास कटकदौंड, वसंत शिंदे, महावीर नारायणकर व अन्य.

# निसर्ग जागृतीसाठी आयुष्य झिझविणाऱ्या डॉ. पाटील यांची वृक्षतुला



**कन्नड (अरुण थोरात) :** राजकीय व्यक्ती, पुढारी, नेते यांच्या वाढदिवसाला पेढे तुला, साखर तुला, लाडू तुला नेहमीच होत असते. मात्र तालुक्यातील बहुली या राज्यातील पहिले फटाकेमुक्त गाव व पर्यावरण ग्राम असलेल्या गावातील निसर्ग प्रेमी नागरिकांनी आपल्या गावाशी गत २५ वर्षांपासून जिव्हाळा, घनिष्ठ नाते जपलेल्या सिल्लोड येथील पर्यावरण , वन्यजीव, वृक्ष संवर्धक म्हणून २० वर्षांपासून कार्य करणाऱ्या डॉ संतोष पाटील यांचा ५० व्या जन्मदिनी आजवर कधीही न झालेली वृक्ष तुला केली. या उपक्रमाचे वैशिष्ट्य सांगताना भाऊसाहेब निकोद यांनी सांगीतले की तराजुच्या एका पारड्यात सन्मानमूर्ती व दुसऱ्या पारड्यात त्यांच्या वजना इतके वायवर्ण, पारस पिंपळ, मोह, पांढरा गुंज, विजयसार, जारूळ, कदंब, अमलतास, काटे सावर, सोन सावर ई. १३५ प्रजातीची स्वदेशी दुर्मिळ झाडे ठेवण्यात आली. एका वेळेस सुमारे ४० रोप भरली. असे जीवनाचे एका वर्षाचे ४० या दराने ५० वर्षाचे २००० रोपांची वृक्ष तुला करण्यात आली. काही रोप आज लावण्यात आली. उर्वरित सर्व रोप राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून बहुली येथील अमृत वनात, शेतकऱ्यांच्या बांधावर, केऱ्हाळा येथील वारकरी संस्था, खेळणा फाटा येथील संघाच्या सात एकर जागेत लावण्यात व संगोपित करण्यात येतील. हरित महाराष्ट्र घडवण्यासाठी असे उपक्रम राबविण्यात यावे व या निमित्ताने देशात हा पायंडा नक्कीच पडेल असा विश्वास बहुली करांनी व्यक्त केला आहे. यावेळी संजय शिरसाठ, भाऊसाहेब निकोद, मधुकर जंजाळ, प्रभत पिसाळ, गजानन जंजाळ, राधाकृष्ण साखळे, समाधान जगदाळ, श्रीरंग तुपे, रविंद तुपे, प्रभू जंजाळ, भिकन सोनोने, ऋषिकेश पंडित, डॉ.शिरसाठ, कृष्णा जरारे, राजू लवटे, सुधाकर बनसोडे, ग्रामस्थ उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002


महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १९ जून २०२६


# हुरहूर - जालनी बोलीतल्या ग्रामीण वास्तवाच्या कथा




जालना जिल्ह्यातील प्रा छबुराव पाटील भांडवलकर रा.कावजवळा ता.परतूर. यांनी मराठी साहित्यात कथा कादंबरी आणि मराठवाडी बोलीशैलीचा अभ्यासक म्हणून जी विशेषत: जालना जिल्ह्यातील ग्रामीण बोली आहे त्या भाषेचं जतन व्हावं म्हणून 'मराठवाडी बोलीचा दस्तऐवज' हे पुस्तक आहे.त्यांच्या कथा कादंबरीचा आवाका हा प्रचंड मोठा आहे.बईनामा,डोह,उन्हाळी दिवस, हूरहूर हे कथासंग्रह. पाठराखण डॉ धोंडोपंत मानवतकर लिहितात "साहित्यस्नेही छबुराव भांडवलकर यांचा हुरहूर हा कथासंग्रह एकूणच ग्रामीण माणसांचा कैवार घेणारा आहे.ग्रामीणाच्या व्यथा वेदनेची परिक्रमा प्रस्तूत कथासंग्रहात प्रतिबिंबीत झाली आहे.दीनदुबळ्या माणसांचा प्रपंच चालविण्यासाठी चाललेला संघर्ष त्यात होणारी त्याची प्रापंचिक वाताहत, त्यांच्या एकूणच संघर्षाचे पैलू या कथासंग्रहात समर्थपणे चित्रित केले आहेत.कथाकार भांडवलकर यांची ग्रामीण जीवनाशी असलेली आस्था आणि ग्रामीणांचे वास्तवदर्शी ॠणानुबंध त्यांना लेखन करण्यास भाग पाडतात.किंबहुना ते त्यांच्या कथालेखनाचे बलस्थान आहे.(ब्लर्ब) 'हुरहूर'लागूनच राहते कोणत्याही गोष्टीची.पाऊस नाही आला.नात्यागोत्यातची ओढ.मनाला हुरहूर लागून जाते या कथेची नायिका धाराबाई उभं आयुष्य कष्टात घातले.शिलाई मशिन काम ते फडे करून इकाचं काम.बंधा जनम दावणीला बांधल्यागत कव्हुन तो पोटासाठी.धाराबाई नवरा गमवल्यावर लेकीच्या घरी राबते तिथंबी कुत्तर ओढ चालूच राहते.मनात एकच हुरहूर जर नवरा असता त् निद्यान हे थांबलं असतं कोरभर कुटका समाधाननं खाला असता."ह्या उभ्या जगात काई मान्स जलमाला येत्यात ते फुटकं नसिबंच घेऊन!त्या फुटक्या नसिबाला कितीबी डाग लावा.ते काही नीट व्हतं नाई.कुत्र्याच्या शेपटीवानी वाकडच ऱ्हात.मायबापानं मोह लगीन करून देलं"(पृ.५१)सुख नाही म्हणून ही मरणभराची हूरहूर.या कथेतील बाईमाणूस कधीचं सुखात नाही.आयुष्यभराची दैनीय अवस्था मन उद्विग्न करून जाते.'निराधार'आजचा ग्रामीण भागाचा समकाल हा या कथेचा आत्मा.ज्याला आधार नाही त्याला पैसाचा आधार द्यायचा हे सरकारी धोरण पण या धोरणाचे दोरखंड झाले अन् म्हाताऱ्या म्हातारीच्या पैशावर पोरं दारखंडे झाले.हे इळनमाळ म्हाताऱ्याला बँकापुढं रांगेत उभं करायलेत.नहीत मायबाला सोडून शहर धरायलेत गावाकडून तेचं विस्थापित झालेत अन् मायबापाच्या कमाईवर डोळा ठिवालेतं.हीशोकांतिका या कथेची आहे.मायबापाच्या वाटण्या झाल्या.या कथेतील खडगुळवाडीचा 'सटवा'त्याचा काढून घेतला बटवा.सटवाची बायको आसराबाई आजारी पडली.सटावाने तिची संपूर्ण देखभाल केली.आपल्या गावातली माणसं आणि माणूसकी सटवानं जतन केली.पण सक्यातले कामाला नाही.अजूही गावं खेड्यातील माणुसकीची माणसं सुख दुःखात साथ देतात.या कथेचा नायक सटवा बायको गेल्यावर निर्धार झाला."माय मेली तरी मुंबईला गेलेल्या मुलांनी वर्ष झालं तरी अजूनही गावाकडं अन् बापाकडं ढुंकूनही पाहिले नव्हते.सटवाला जाणवलं आता मी एकटा पडलो.मी निर्धार झालो.असं मनालाचं बोलून तो हमसून हमसून रडत होता.(पृ.७१)अशी ही आजच्या वर्तमानाची अस्वस्थ बेइमानी करणारी कथा.'शेत ख्याय कुपाटी' आता कुपाटीचे साळे,बारभाई खेती करू लागले.शेतानंच बंदी कुपाट खाली तर कुणबीक ही औताडी राहिलीचं नाही.शेती करायची म्हटलं की आत बट्याचा धंदा.कापूस,यचनी,निंदणी,खुर्पनी,काढणी ,सोंगणी या संमद्या धंद्यासाठी रोजंदारनी अणनं अन् काम करुन घेणं.या कुणबीकित जात्या उभं राहून काम केलं तर खरं नाहीतर हेच शेतं अन् बांधावरच्या कुपट्या अन् साळवे जळतनं म्हणून उपटून काढू पुरी वाट लावली जाते.या कथेत रोजंदारीनंच सारं शेतं खाल्लंपैसे घेऊन हुंबली घेणं."जेवढा खर्च केला तेवढा मालच झाला नाही.मग देणं घेणं व्हणार कसं? शिवाय आपून त्याला इस हजाराला चुना लावलाय.. ही व्यथा तर "लय लोकं मजूर मजूर मनून वल्डायलेत.. तवा ते ह्याला आपला पंगण्या हातचं माईत नाई..! शेतकऱ्याचीच लव्कर रंडकी कशी करायची..ते आमाला पक्क माईत हे..!(पृ.१०६)ही आजची खराब झालेली नितीमत्ता.'परवड' एका बाईच्या वाट्याला आलेलं परडडीचं दु:ख.नवरा बहात्तर खोडीचा खोटारबाज या कथेती प्रयाग अतोनात हाल अपेष्टा सहन करते.तिच्या वाट्याला सुख येतंच नाही.ती अशा भयान अवस्थेत जीवाचं बरं वाईट करून घेण्यासाठी रेल्वे रुळाकडे जाते."तिच्या मनात एकच विचार होता पावलोपावली अपमानचं जगल्यापरिस मेलेलं बरं..!(पृ.१४८)शेतकऱ्यांची बारहमीस,सदान्कदा ही जीवाची परवड.इथं शेतकरी हा कृषिप्रधान कृषक बळीवंत राजा आहे.आपल्या वावरातल्या माय मातीसाठी ह्या देहाची घामाची खर्ची करणारा शेतकरी बहुल विचारी आहे.'कावळा पिंडाला शिवला' ही इथल्या मानसिक व्यवस्थेलालागलेली किड आहे.युगानुयुगे मानवी मनाची भ्रमण शक्तीस भ्रमित करणारी मानसिकता इतकी दृढ झाली आहे की पिंडीला कावळा शिवला म्हणजे मोक्षप्राप्ती मिळणे होय.हा मातीचा देह मढ धड होऊन जळतो राख होते.पण कावळा बावळा होऊन शिवला पाहिजे नस्ता.जीवंतपणी मारल्या लाथा, अन् मेल्यावर टेकवतो माथा."आवो राव..!मथाऱ्याचा समदा जीव लेकीत न् जावयातगुतला व्हता "..ते दोगं मन्ले कावळ्यानं पिंडाला शिवलं बगा...अरे..!लेका -सुनावर त्याचं ऱ्हायली नाई..कसा शिवन पिंडाला कावळा? बप्पा..!(पृ.१६१)या मानवी मनाच्या श्रध्दा अंधश्रद्धा कायमचं चालू आहे.ग्रामीण विश्वाच्या तोंडूळ्यातून मानसिकता आणखी गेलीच नाही म्हणून हे कावळे उडवून देणारी कथा भांडवलकर मोठ्या खूबीने शैलीदार संवाद फलंदाजी करतात.'वाटणी' ही अतिशय गंभीर विचारप्रवर्तक कथा आहे.वाटणी साठी झगडे भांडणतंटे इतभर साठी डोके फोडा फोडी.या वाटणीच चटणी करणारी कथा वाचकाला खंमग ठसका देऊन जाते.इतभरसाठी इळभर तारांबळ उडवून वाटणी करायची.यशोदा अन् तिच्या दोन सुना यांच्या मधील कामाच्या वाटणी,दोन पोरं मधील कामाची वाटणी, एवढंच नाही मागुन वायल निघानं संसार बघा.पुन्हा माय बापाच्या वाटणी म्हतारी सहा महिने अन् म्हतारं सहा महिने ही धाटणीचे वाटणी या समकालीन वास्तवाची ही एक फोडणी आहे."जमानाचं असा आलाय.मायबाप नग फकस्त नवरा पायजी. मग मायबापानं जावा तरी कुठं? अन् खावातरी काय?पण,या ध्यानात ठुवा..तुमीबी मथारे होनार हेतं.. आता तरी कमीत कमी मायबापाला लेकं इच्छारायलेतं..!पन तुमच्या काळात लय अवघड होणार हे"(पृ.१८८)अशी वास्तव भाष्य करणारी कथा वाचकांच्या मनाचा ठाव घेतल्या शिवाय राहत नाही.प्रा.छबूराव पाटील भांडवलकर सर यांच्या समग्र कथा ह्या अतिशय समर्पक समृद्ध सकारात्मक विचारधारेच्या आहेत.त्यांच्या कथेतून समकालीन ग्रामीण कथेचा अनुबंध दिसून येतो.कथेचा अवकाळी आवाका जरी असला तरी कथाबीज हे अतिशय मौलिक अधिष्ठान प्राप्त करून देणारे आहे.जसे हूरहूर, लावणारी व्यथा,भोग आयुष्याचा हा संचिताचा आहे विळखाच आहे.निरधार आहे जगती पुत्र मानवाचा हा जन्म म्हणजे एक मनुष्यत्वाची धार घेऊन लालेला आहे.ती धार फक्त बोथट होऊ देऊ नको तू निर्धार नाहीच.पान खाते ह्या हमारा तसे शेत खाय कुपाट अन् मोडून गेलं धोपटं.परवड म्हणजे एक नवा चवताळून आलेली संधी.कावळा शिवत नाही म्हणून दु:खाचा मेंगळा बाजार मांडणारी ही व्यवस्था.तर आजच्या जन्मादात्याची वाटणी करणारी आवल्याद.शेती माती,घरभिंती,भगूने पराती.अशी वाटणी होत होती.पण मायबाप भाकर कोल्डयास याची वाटणी मन गहिवरून आणणारी ही कथा आहे.प्रा छबुराव भांडवलकर मनोहर मनाने मनोगत लिहितात."मी खेडेगावात राहत असल्याने गावातील आर्थिक, राजकीय सामाजिक परिस्थिती पाहता होतो.आणि काय आश्चर्य.. मला प्रत्येक माणुसच कथारुपता दिसू लागला मनातील घालमेल कागदावर उतरू लागलो.बघता बघता कथासंग्रह तयार झाला.(मनोगत) आदरणीय सरांना लेखनाच्या हार्दिक शुभेच्छा.

**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालनापुस्तक:-हुरहुर (कथासंग्रह)लेखक:-प्रा.छबूराव भांडवलकर प्रकाशक:- डॉ धोंडोपंत मानवतकर शब्दभूमी प्रकाशन मुखपृष्ठव रेखाटने:- डॉ धोंडोपंत मानवतकर प्रथमावृती:-१ जानेवारी २०२१किंमत:-२००/रुपये**



**-डॉ प्रभाकर शेळके**






महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १९ जून २०२६


# मानवी जीवनाच्या 'पायांच्या लयीचा' वर्तमान दस्तऐवज

'माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे', हा समाजशास्त्रीय सिद्धान्त घासून गुळगुळीत झाला असला, तरी त्याची यथार्थता नाकारता येत नाही. माणूस... मग तो कोणत्याही सामाजिक वर्गवारीतील किंवा जीवशास्त्रीयदृष्ट्या भेद असणारा असो, त्याच्या मनात जगण्याच्या मार्गाआड येणाऱ्या गोष्टींबद्दल खदखद निर्माण होतेच. ही खदखद तो आपल्या नेणिवेच्या तळघरात पुरून टाकतो. पुरलेली खदखद जेव्हा सर्जनाचे रूप घेऊन येते, तेव्हा त्या रूपांत जर नवीनता, प्राधान्य आणि लघुत्व ही तीन वैशिष्ट्ये जाणवली, तर ती दखलपात्र ठरतात. आर्थर कोस्लर ह्यांनी प्रतिभावंतांच्या कार्याचे हे तीन विशेष प्रतिपादित केले आहेत. डॉ. सुधीर देवरे लिखित 'पाय नसलेली माणसं' ह्या कवितासंग्रहातील कविता वाचताना लक्षात येते की, वर उल्लेखलेल्या तीनही वैशिष्ट्यांसाठी अभियुक्त अशा ह्या कविता आहेत. त्यांच्या अनुषंगाने हया कवितेमधून बरेच काही सापडते. कविता ह्या साहित्य प्रकाराबद्दल केल्या, लिहिल्या गेलेल्या सैद्धांतिक व्याख्या, चर्चा इ. मुद्द्यांबद्दल इथे विस्ताराने लिहिणे अप्रस्तुत ठरेल. मात्र कविता म्हणजे गुलबकावलीचे अप्राप्य फूल असल्याचे कवींना आणि कविताप्रेमींनाही सतत जाणवत राहते. हाती गवसणे आणि गवसून निसटल्याचे भास होत राहणे, म्हणजे कविता उमजून येणे होय. असे असले तरी, कवितेचा 'अभ्यासपूर्ण मागोवा' घेणे ही नक्कीच एक आनंददायी प्रक्रिया आहे. डॉ. सुधीर राजाराम देवरे ह्यांच्या कविता ह्यापूर्वी 'भंग अभंग' आणि 'फुटूच लागतात पंख' ह्या कवितासंग्रहात वाचल्या होत्या. त्याच वेळी त्यांच्या कवितेतील वेगळी नवीनता जाणवली होती. 'पाय नसलेली माणसं' मधील कविताही जे जीवन-चिंतन मांडते, ते 'नवीनते'चा एक वेगळा कंगोरा उजेडात आणते. तिच्यामध्ये आत्मपरतेला 'प्राधान्य' असले, तरी ती दुसऱ्या बाजूने 'कॉमन मॅन'च्या मनातील खुपण्यालाही 'प्राधान्य' देताना दिसते. तसेच आकृतिबंधातील 'लघुत्व' घेऊन आलेल्या ह्या संग्रहातील अनेक कविता ह्या आयुष्याचा 'दीर्घ आशयपट' वाचकांसमोर उलगडतात. ह्या कविता 'कथा' सांगत आहेत 'माणसांच्या'. 'पाय नसलेली माणसं' ही तीनही पदे ह्या कवितांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात, तरी 'पाय असलेली किंवा नसलेली' अशा शारीरिक वर्गवारीच्याही पलीकडे 'संवेदना नसलेली' अशा माणसांच्या जगात आज आपण जगत आहोत, ह्याबद्दल चीड येते. ही हतबलता 'पाय असलेल्या आणि डोके नसलेल्या निर्बुद्ध माणसांत' स्वतःची गणती करण्यास भाग पाडते. प्रस्तुत पुस्तकातील कविता वाचल्यावर, एक वाचक म्हणून मनात आलेली ही एक उत्स्फूर्त प्रतिक्रिया आहे, हे आवर्जून नमूद करावेसे वाटते. भाषिकतेच्या मार्गाने जात तुमच्या भावना आणि बुद्धी ह्या दोन्हीला एखादी कविता चेतना देते, तेव्हा तिची चांगल्या- किंबहुना उत्तम कवितेकडे वाटचाल सुरू असते. विसाव्या शतकातील ज्येष्ठ कवी बा. सी. मर्ढेकर ह्यांनी कवितेच्या आस्वादनासाठी मांडलेला 'लयसिद्धान्त' हा टीकाकारांचे लक्ष्य बनला, तरी त्यामधून प्रतीत होणारा कवितेच्या समग्र रूपाचा- गेस्टाल्ट- वेध घेण्याचा विचार महत्त्वाचा ठरतो. त्या सिद्धान्तानुसार एखाद्या चित्राकडे पाहावे, तसे कवितेकडे पाहिले तर तिच्या मागचा कॅनव्हास, त्याची चौकट, चौकटीमधील शब्दरेषांची साधली गेलेली आंतरिक लय लक्षात येते. 'मर्ढेकरांनी 'लय' ही संज्ञा पुलिंगी वापरलेली आहे. कवितेच्या संदर्भातच वापरला जाणारा 'आंतरिक लय' हा शब्दप्रयोग नेमकेपणा नसलेला, भोंगळ स्वरूपाचा आहे.' असे ज्येष्ठ समीक्षक वसंत पाटणकर ह्यांनी 'कविता: संकल्पना, निर्मिती आणि समीक्षा' ह्या ग्रंथात म्हटले आहे. असे असले तरी आपण एखाद्या कवीच्या काही कवितांचा समग्र अभ्यास करतो, तेव्हा त्यांना जोडणारी लयीची एकसंध तार गवसू शकते. (असे मर्ढेकरांच्या विधानाचा आदर राखून नमूद करावेसे वाटते.) कवितेचा कॅनव्हास पारंपरिक आकाराचा नसेल, तर त्यावर रेखाटलेली कविताही रूढ कवितेपेक्षा वेगळी ठरते. आधुनिक कालखंडात- म्हणजे साधारण १९९० नंतर मराठी कविता गेयतेपेक्षा गद्यात्मक रचनेकडे अधिकाधिक झुकल्याचे दिसून येते. मग अशा गद्यप्राय कवितेत 'लय' असते का, असा प्रश्न पडतो. ही लय रूढार्थाने 'लय' नसते. लयसिद्धान्तामध्ये अपेक्षित असलेली लय (मर्ढेकरांची पुल्लिंगी लय) त्या कवितेतील संवाद, विरोध आणि समतोल ह्या घटकांनुसार साधली जाते. 'जी कविता वाचकाच्या मनाचा ठाव घेते, ती उत्तम कविता', ही कवितेची एक सर्वमान्य व्याख्या आहे. मात्र एखाद्या कवितेचे- इथे 'एक कविता' ही प्रातिनिधिक- आस्वादात्मक मूल्य तपासताना ही व्याख्या पुरेशी ठरत नाही. 'पाय नसलेली माणसं' मधील कवितेचा कॅनव्हास, त्याची व्याप्ती, आकार आणि मुख्य म्हणजे त्यावरील शब्दरेषांमधून व्यक्त झालेले जीवनचित्र हे आपल्यापर्यंत समग्र- गेस्टाल्ट- प्रकारे कोणती लय पोहोचवते, हे ह्या कवितेच्या अंतरंगी शिरून शोधणे हा एका वेगळ्या अर्थाने आनंदाचा प्रत्यय आहे. 'पाय नसलेली माणसं' मधील कवितेचा आकृतिबंध उपजतच एक ठोस विचार आणि कणखर भावनांचे मिश्रण घेऊन आलेला आहे. कवितेच्या आशयानुसार हा आकृतिबंध अनेक ठिकाणी लघु रूपांत दिसतो, तर अनेक ठिकाणी दीर्घ स्वरूपांत. अर्थदृश्यातून तो उलगडत जातो. प्रस्तुत कवितासंग्रहाचा एकात्म आकृतिबंध हा तीन विभागांत विभागलेला आहे. विभाग एक : पाय बदलता येत नाहीतविभाग दोन : पावसात पाय पसरूनविभाग तीन : विविध शीर्षकांच्या असमान पायांच्या कविता. शीर्षकावरून संग्रहातील कवितेबद्दल वाचकाच्या मनात उत्सुकता निर्माण होते. तीन विभागांच्या रचनेमागे कवीचा स्वतःचा एक रचनात्मक आणि निर्णयात्मक विचार आहे, हे समजते. पहिल्या भागातील जास्तीतजास्त कविता ह्या काव्यात्मक 'अनुभव' कथन करतात, तर पुढील दोन भागांतील अधिकाधिक कविता ह्या 'संवेदनां'चे शब्दचित्र साकारतात. पैकी दुसर्या भागात संवेदनांसह चिंतनाचा पाऊस भेटतो. 'पाय' ही ह्या कवितांची 'थीम' असल्याचे, शीर्षकावरूनच लक्षात येते. मात्र त्यानंतर 'पाय' असणे, नसणे, कसे, कोणाचे, किती, का इत्यादी प्रश्न निर्माण होतात. एकेक कविता वाचत गेल्यावर लक्षात येते हे 'पायपुराण' निश्चितच वेगळे आहे. पाय ह्या अवयवालाच ह्या कवितेने शरीर बहाल करून 'प्राधान्य' दिले आहे. ह्या कसोटीवर 'पाय' ही ह्या कवितेची 'लय' आहे, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये. 'पाय' हा अवयव इथे एक भावना आहे, एक विचार आहे. तो 'जीवनभान' हे मूल्य घेऊन येतो, आणि म्हणूनच त्यामध्ये 'नवीनता' आहे, हेही स्पष्ट होते. काही ओळी उदाहरणादाखल :'पार्थिव कचऱ्याला / गावाबाहेर पडायला / आपोआप फुटत नाहीत / तंदुरुस्त सशक्त पाय!' (मोकळा प्लॉट). 'या जंगलाच्या कायद्यात / भाषेत व्यक्त होता येत नाही / डोक्यापुरत्या सावलीतल्या / या वैराण उन्हाळी वाळवंटाचं / काय करावं ते समजत नाही / पाय बदलता येत नाहीत' (काय करावं ते समजत नाही). 'चालताना केव्हाही / उचललेला पाय / रस्त्यावर पुढं / पडेलच असं नाही / कोणत्याही क्षणी / अधांतरीची हवाही / वरच्यावर गिळू शकते / आपला अमूर्त जीव!' (अधांतरीची हवाही). 'पाय नसलेली माणसं' मधील कविता ही वाच्यार्थाने बोलणारी कविता नाही, तरीही ती वाचकाला समजणारी आणि उमजणारी कविता आहे. तिच्यातील अनेक रूपके पारंपरिक आहेत. मात्र त्यांमधून समोर येणारे अस्तित्वभान हे वाचकाला हेलावून टाकते. उदा. ह्या संग्रहातील अनेक कवितांमध्ये निसर्गाचे अमर्याद अस्तित्व, मानवी भावना इत्यादीचे रूपक म्हणून 'झाड' उभे ठाकते. ते पारंपरिक असले, तरी ह्या कवितांमध्ये त्याचे स्वरूप 'अस्वस्थ अनवट' असे 'वेगळे' दिसते. झ्याक लॉकॉन ह्यांनी असे म्हटले आहे की, 'The unconscious is structured like language.' (समीक्षा मीमांसा, गंगाधर पाटील, सिद्धान्त आणि समीक्षण, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०११, पृ. १५७) नेणिवेतील भावनांचा विस्कळीत पसारा हा भाषिक रूपबंधातून आकाराला येतो, तेव्हा तो नवीनता घेऊन येतो. नेणिवेतील दमन केलेले भाव हे भाषेच्या संरचनेत रूपके, प्रतिमा ह्यांच्या अशा 'अस्वस्थ अनवट' रूपांतून ह्या कवितांमध्ये सहजरीत्या प्रकट होतात. म्हणूनच 'नावीन्य किंवा नवीनता' ह्या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. 'आभाळात तरंगणाऱ्या झाडांना / माणसाची भाषा अवगत नाही... / चालीत गुंग माणसासहित / कोणत्याही जंगम प्राण्यांना / ढग ओळखत नाहीत... / तहानलेल्या झाडांची शीळ / उडणाऱ्या ढगांना ऐकू जाते... / ढग झाडांच्या नेत्रपल्लवीत / नवीन भाषा जन्माला येते...' (सृष्टीचे अध्याहृत पाय). कविता म्हणजे भरगच्च प्रतिमांचे आगर नव्हे. मात्र कवितेतील प्रतिमा ह्या कवितेला आशयसौंदर्य बहाल करतात. प्रस्तुत संग्रहातील अनेक कविता विधानात्मक आहेत. मात्र ह्या विधानांमध्ये असलेल्या प्रतिमांमुळे त्या विधानांचे काव्यमूल्य वृद्धिंगत होते. वानगीदाखल ह्या काही ओळी- 'पायरव नसलेल्या शांततेत / माणसांचा कचरा झाला / सृष्टीत फक्त वाळवंटच असतं असं नाही / ओयासिस फक्त वाळवंटातच असतं असंही नाही.' 'भावकविता' ही वाचकाबरोबर भावविण्याचा करार करते, असे ज्येष्ठ समीक्षक मिलिंद मालशे ह्यांनी नमूद केले आहे. (मालशे, १९८७, पृ. १५१). भावविणे हे भावविश्वाशी, म्हणजेच मनाशी निगडित असते. कविता म्हणजे 'आत्मस्वर', कविता म्हणजे 'आपलाचि संवाद आपणासि' इत्यादी कवितेच्या 'आत्मनिष्ठ' स्वरूपाबद्दल कवितेविषयीच्या समीक्षेत लिहून ठेवले आहे. ते योग्यच आहे. मात्र ही 'आत्मरत' कविता जोपर्यंत एका अर्थी 'सामाजिक' होत नाही, तोपर्यंत तिच्या 'स्थिती'रूपाला 'गती' मिळाली, असे म्हणता येणार नाही. 'पाय नसलेली माणसं' मधील कविता ही जितकी आत्ममग्न आहे, तितकीच ती बाह्य जगाशी संवाद साधताना दिसते. हा विरोधाभासच तिला 'आत्म-पर भावकविता' हे वैशिष्ट्य बहाल करतो. तिच्यामध्ये अंगभूत असलेला 'सूचितार्थ' तिच्या आशयाला 'सार्वत्रिक, सामाजिक सत्य' ह्या पातळीवर नेतो. म्हणूनच ह्या संग्रहातील कविता वाचताना 'पाय नसलेल्या माणसा'च्या जीवन-विद्रोहात वाचकही गुंतून जातो. हा विद्रोह बेगडी नाही आणि कवी हाती आयुधे घेऊन युद्ध करायला निघालेला नाही. ह्या कवितेतील 'मी' हा निवेदक सर्वसाक्षी आहे. त्याच्या कथनाला समष्टीचा आशय आहे. त्यामुळे, ह्या कवितेचा प्रवास व्यक्ती ते समष्टी असा होतो. मात्र तो पुन्हा व्यक्तीकडे वळून वर्तुळ पूर्ण करतो. प्रत्येक कविता ही आजच्या समाज-व्यवस्थेवर केलेले गंभीर चिंतन असूनही तो शाब्दिक खेळ नाही. ह्या कवितांचा प्रत्येक विषय 'आज'शी निगडित आहे. आज जगत आणि मरत असलेल्या सामान्य माणसाशी निगडित आहे. संस्कृती, समाज, राजकारण, अर्थकारण, पर्यावरण,शिक्षण, नातेसंबंध ह्या घटकांना कवेत घेणारी अशी ही कविता आहे. दुःख, निसर्गापासून तुटल्याची जाणीव, समाजाचे भंपक बुरखे पाहून आणि क्रूर वास्तव अनुभवून येणारी चीड, हताशा ह्यांना आपल्यात झिरपवणारी अशी ही एका वेगळ्या पाऊलवाटेवरची भावकविता आहे. संवेदनशील वाचकाला अंतर्लक्षी करणारी अशी ही वैचारिक मंथनाचीही कविता आहे. वानगीदाखल ही काही शीर्षके : 'प्रेषित स्वर्गात दिसून आला नाही', 'निसर्ग फुलवणाऱ्या कृत्रिम वेणा', 'या वर्तमानाचं काय', 'सपाटीला सर्वस्वी कारणीभूत', 'हो, मीच मारलं सूर्याला', 'सृष्टीचा आदिम पाय...', 'माणसाला वाटणार नाही माणसाची लाज' इत्यादी. कवीची भूमिका आणि पंथाविषयी- साहित्यिकाने... विशेषतः कवीने भूमिका घ्यावी की, घेऊ नये, ह्याबद्दल सतत चर्चा घडत असतात. तशीच ती कोणत्या स्वरूपाची असावी, ह्याबद्दलही वाद होतात. कवींचे पंथ असतात का? असावेत का? ह्याबद्दल ज्येष्ठ समीक्षक वसंत पाटणकर लिहितात, " 'पंथ' या संज्ञेचा अर्थसंकोच करण्याचे कारण नाही. एखाद्या व्यक्तीची विचारप्रणाली कोणती आहे, त्याची जीवनदृष्टी कोणती आहे... 'पंथ' या संज्ञेत या अर्थाचा समावेश करता येईल. कोणत्याही लेखक-कवीचा पंथ कोणता, याचा शोध घेताना वाङ्मयाबरोबरीनेच त्याच्या जीवनचरित्राचाही आधार घेतला जातो." ('कविता : संकल्पना निर्मिती आणि समीक्षा'). साहित्य-आस्वादकाच्या दृष्टीने हा विषय विचारात घेण्यासारखा आहेच. इतरही अनेक महत्त्वाचे मुद्दे आहेत, मात्र ह्या कवितासंग्रहातील कवितांमधून कवींची जीवनदृष्टी ही भोवतालाकडे सजगतेने बघण्याची आणि तो सहृदयतेने जाणून घेण्याची आहे. तसेच केवळ 'बघ्या'ची भूमिका न घेता, भोवतालातील घटनांचा कार्यकारणभाव तपासून, त्याबद्दल कवितेतून सशक्तपणे भाष्य करण्याची ताकद ह्या कवितेत आहे. मानवी जीवनाच्या अकराळविकराळ वर्तमानाचा ती दस्तऐवज आहे. खरेतर, एकूणच जीवन- व्यवस्थेला अगणित अर्थहीन असे पायच पाय फुटलेले सध्या आपल्याला दिसत आहेत. ह्या पायांना 'अमर्याद वेग' आहे, पण अंदाधुंद अशा रस्त्यांवर ते दिशाहीन भटकत आहेत. सरपटत आहेत. पाय असूनही ही माणसे 'पाय नसल्यासारखी' आणि 'बुद्धीही नसल्यासारखी' जगत आहेत का? हा सवाल ही कविता उपस्थित करते. एकुणात, सुरुवातीला नमूद केल्याप्रमाणे ह्या संपूर्ण कवितासंग्रहाची 'लय' ही 'पाय' आहे. ह्या पायांच्या कवितेला स्वतःचा 'तोल' ढळू न देता, इतरांचा 'ताल' सांभाळायचा आहे. सर्वांचे जीवन सुखकर व्हावे, हाच तिचा अंतिम 'नाद' आहे. पाय नसलेली माणसंसुधीर राजाराम देवरे.

**प्रकाशित : १७ मार्च २०२६शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.पृष्ठ : १७५**

**किंमत : ३०० रू.**

**- डॉ. निर्मोही फडके**